# वार्ता टिपण दि.०२/०७/२०१९

## सुमारे १६ किलोचा गांजाचा विक्री करणेकरीता साठा केलेल्या महिलेला खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथक,गुन्हे शाखा, यांचेकडुन अटक

दि.०१/०७/२०१९ रोजी गुन्हे शाखेकडील खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथक,पश्चिम पुणेचे पोलीस निरीक्षक श्री.राजेंद्र मोहिते हे त्यांचे स्टाफसह वारजे माळवाडी भागात बेंकायदेशिर अंमली पदार्थ विक्री करणारे संदर्भात माहिती काढणेसाठी गस्त घालीत असताना,पोलीस कर्मचारी सुमित ताकपेरे व प्रविण पडवळ यांना महिला नामे श्रीमती श्रीमती सुनिता सिकंदर भाट वय-४७ वर्ष धंदा-घरकाम रा.अमर भारत सोसायटी सर्व्हे नं.४६/२, महादेव मंदिराजवळ वारजे माळवाडी पुणे यांचे घरात मोठया प्रमाणात गांजाचा साठा असलेची बातमी मिळाली होती.सदर बातमीनुसार पंचासह वर नमुद ठिकाणी छापा टाकला असता, तेथे १५ किलो ८७३ ग्रॅम वजनाचा किं.रू.२,३८,०५०/- चा गांजा मिळाला होता. सदर गांजा जप्त करून वर नमूद महिलेविरूध्द वारजेमाळवाडी पोलीस स्टेशन पुणे गु.र.नं.२६५/२०१९ एन.डी.पी.एस. ॲक्ट क. ८(क), २०(ब) (ii)(ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.सदर गुन्हयात वर नमूद महिलेला अटक केली आहे.

सदरची कामगिरी ही, मा. अपर पोलीस आयुक्त,गुन्हे श्री.अशाक मोराळे सो, पोलीस पोलीस उप आयुक्त श्री.शिरीष सरदेशपांडे सो. सहा.पोलीस आयुक्त गुन्हे १ श्री.समीर शेख सो.,यांचे मगादर्शनाखाली खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथक,पश्चिम पोलीस .निरीक्षक श्री.राजेंद्र मोहिते,पोलीस उपनिरीक्षक आनंद रावडे व निखील पवार पोलीस कर्मचारी महेश कदम,महिला पोलीस ढेबे, प्रमोद मगर, भाऊसो. कोंढरे, मनोज शिंदे, रमेश गरूड, हनुमंत गायकवाड, पांडुरंग वांजळे, विजय गुरव,सुनिल चिखले, फिरोज बागवान, मंगेश पवार, अमोल पिलाने, सचिन कोकरे यांनी केली आहे.